आज़ादी का
अमृत महोत्सव


MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LVIII, 23 March 2022

# जागतिक स्त्रीवाद आणि मराठी साहित्य



* मुख्यसंपादक *
प्राचार्य डॉ. वसंत बिरादार

* संपादक *
डॉ. अनिल मुंढे

* सहसंपादक *
डॉ. मारोती कसाब

Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

## *A Peer Reviewed Referred Journal*

## Quarterly Research Journal

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE – LVIII Year – 6 23 March 2022**

**किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर व्दारा संचलित**

**महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर (महाराष्ट्र)**

(एक दिवशीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र)

# जागतिक स्त्रीवाद आणि मराठी साहित्य

:: मुख्यसंपादक ::

**प्राचार्य डॉ. वसंत बिरादार**

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

:: संपादक ::

**डॉ. अनिल मुंढे**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

:: सहसंपादक ::

**डॉ. मारोती कसाब**

मराठी विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**Address for Correspondence**

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded.(MH. India)

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India - Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| ०१. | आदर्श व्यक्तिमत्त्वाचा शोध : युगस्त्री फातिमाबी शेख | डॉ. शेषराव नाईकवाडे | ०१ |
| ०२. | अरुणा ढेरे यांच्या कवितेतील स्त्रीवादी जाणिवा | सुचित्रा अशोक मदाने | ०४ |
| ०३. | स्त्रीवादः संकल्पना व स्वरुप | पंडीत नाना लहाने | ०८ |
| ०४. | मराठी कथा - कादंबऱ्यांतून प्रकट झालेला स्त्रीवाद | बाबासाहेव पांडुरंग लबडे<br>प्रा. डॉ. सविता खोकले | १२ |
| ०५. | मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद | डॉ. रंदिल गर्जेद्र साहेबराव | १६ |
| ०६. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | दीपक शिवदास पाटील<br>डॉ. शशिकांत पाटील | २० |
| ०७. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले | डॉ. रामकिशन दहिफळे | २३ |
| ०८. | आदिवासी कवितेतील स्त्रीजीवन | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | २५ |
| ०९. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतून व्यक्त झालेला स्त्रीवाद | डॉ. श्रीहरी दासू चव्हाण | ३२ |
| १०. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | डॉ. सुभाष भगवान देशमुख | ३५ |
| ११. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | डॉ. गणपती जोतीबा मोरे | ३७ |
| १२. | स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. डी. के. आहेर | ३९ |
| १३. | प्रेमा कंटक यांचे कादंबरी लेखन | डॉ. विजय गणपतराव वारकड | ४१ |
| १४. | महात्मा जोतीराव फुले यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन | डॉ. गोविंद काळे | ४३ |
| १५. | मराठी स्त्री ओवीगीतांतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद | प्रा. बबन अण्णासाहेब गित्ते | ४७ |
| १६. | मराठी कवितेतून अभिव्यक्त झालेला स्त्रीवाद : विशेष संदर्भ - 'तारी' | डॉ. ललिता सत्यनारायण आय्या | ५१ |
| १७. | भारतीय स्त्री वादाच्या प्रणेत्या : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी | ५९ |
| १८. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | सुभाष हासाजी डोंगरे | ६४ |
| १९. | गौरी देशपांडे यांच्या साहित्यातून येणारा स्त्रीवाद | सविता भिवा धनवडे | ६६ |
| २०. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा. नवनाथ निवृत्ती बेंडे | ६९ |
| २१. | मधु सावंत यांच्या कादंबरीतील राजकीय व सामाजिक स्त्री अस्तित्वाचा लढा | डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे | ७२ |
| २२. | कवितेतील स्त्रीचे आत्मभान | प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे | ७६ |
| २३. | भारतीय स्त्रीवादाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | प्रा. राजकुमार मोरे | ७९ |
| २४. | स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप | स्नेहा व्यंकटराव वाघमारे | ८२ |
| २५. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कवितेतील स्त्रीवाद | डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर | ८५ |
| २६. | सत्यशोधक ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवाद | अक्षय बालाजी रत्नपारखे | ८८ |
| २७. | मराठी आदिवासी कवयित्रींच्या काव्यातील स्त्रीवाद | प्रा. डॉ. राजकुमार मुसणे | ९३ |
| २८. | सत्यशोधक ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवाद | डॉ. मथुरा मेवाड | ९९ |
| २९. | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री आणि आव्हाने : चित्रा | संतोष मारोती चमकुरे | १०२ |

# आदिवासी कवितेतील स्त्रीजीवन

**डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय परतूर, जि. जालना.

आदिवासी समाज हा आपले आदिमपण अजूनही टिकवून आहे. आजही तो वैज्ञानिक बदल व भौतिक सुख समृद्धी या पासून कोसो दूर आहे. भारतीय स्वातंत्र्यपूर्व कालखंडात प्रस्थापित समाजाच्या गुलामीत भरडला जाणारा हा समाज स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र राज्यघटनेच्या संरक्षण कवचाखाली स्वतःला सुरक्षित समजू लागला. 'स्व' सामर्थ्याची त्याला जाणीव होऊ लागली. पुढारलेल्या समाजाच्या दृष्टीने आपण मागास ठरवले जात आहोत. आपले हक्क हिरावून घेतले जात आहेत. ही भावना त्यांच्यामध्ये निर्माण झाली. परिणामी तो स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करू लागला.

स्वातंत्र्यपूर्व कालखंड हा अनेक घटना घडामोडींनी गाजलेला कालखंड आहे. म. फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाजसुधारकांनी केलेले सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्य अतिशय अनमोल असे आहे. प्राचीन काळापासून अंधश्रद्धेच्या गर्तेत रुतून बसलेला हा समाज आत्मभान येऊन जागृत होऊ लागला. म. फुले, म. गांधी यांच्या कार्याने प्रेरित ग्रामीण समाज शिक्षणाचे महत्त्व ओळखून वाटचाल करू लागला. ग्रामीण भागातील सुशिक्षितांना साहित्याच्या माध्यमातून आपले दुःख साकार करण्यास प्रेरणा मिळाली आणि कविता, कथा, कादंबरी, आत्मचरित्र लेखनास चालना मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महान कार्य दलित समाजाला प्रेरणा देणारी ठरली. त्यातूनच दलित साहित्याचा जन्म झाला आणि गावकुसाबाहेरील उपेक्षित समाज शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक बदल घडवून आणू लागला. नकार, विद्रोह, वेदना, आत्मशोध या वैशिष्ट्यांनी युक्त अस्स्ल साहित्यनिर्मिती प्रस्थापित समाजव्यवस्थेला हादरे देऊ लागली. हजारो वर्षांच्या लाचारीतून-गुलामीतून व्यवस्थेच्या जाचातून, देव-दानव, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य या संकल्पनांच्या जाळयातून दलित समाज स्वतःला बाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागला. एका नव्या युगाची सुरुवात झाली. स्वातंत्र्यपूर्वकाळात बंदिस्त जीवन जगणारी स्त्री स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र आपल्या अधिकारासाठी लढा देण्यास सिद्ध होऊ लागली. परिणामी स्त्रीवादी साहित्य चळवळ भारतात रुजण्यास सुरवात झाली. सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य समाजातील बंदिस्त स्त्री जीवनाला चालना देणारे ठरले. सुशिक्षित होत असलेली आधुनिक जीवनशैलीच्या प्रभावात वाढणारी स्त्री साहित्याच्या माध्यमातून स्वतःचे सुख-दुःख अभिव्यक्त करू लागली आणि समाजात स्त्रीवादी साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाला.

आदिवासी लिखित दर्जेदार साहित्य निर्माण होण्यास मात्र स्वातंत्र्यानंतरही तीन दशके वाट बघावी लागली. तोपर्यंत ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्य प्रवाहांनी समाज मनात बदलाची बीजे पेरलेली होती आणि शहराबरोबरच गाव व गावकुसाबाहेरील जनजीवन ढवळून निघत होते. समता, न्याय, बंधुता मानवतेची हाक दिली जात होती. मात्र, डोंगराच्या कुशीत झाडाझुडपांच्या निसर्गाच्या सानिध्यात जमेल तशा अवस्थेत आपले जीवन व्यतीत करणारा, दारिद्र्याच्या खोल गर्तेत खितपत पडलेला आदिवासी समाज मात्र अस्थेव्यतिरिक्त प्रस्थापितांच्या गंभीर लेखनाचा विषयी होऊ शकला नाही. त्यांच्या लेखनात आलेला आदिवासी माणूस हा आपले दुःख घेऊन अवतरले याच नाही.

यानंतर इ.स. १९७० ते ८० च्या दशकात आदिवासी साहित्य प्रवाहाची वाटचाल मूळ धरू लागली. महाराष्ट्र आणि देश पातळीवर मराठी-हिंदी बरोबरच जमातनिहाय भाषांमधून आदिवासी साहित्य निर्माण होण्यास सुरुवात झाली. विविध लेखक-लेखिकांचा यातून उदय झाला. लोककथा, लोकगीत, लोकनृत्याची आदिवासी समाजाची परंपरा तर समृद्ध आहेच परंतु कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन अशा साहित्य प्रकारांतून आदिवासी साहित्यिक आदिवासी समाजातील तुटलेपण, दुःख, दैना, वेदना, गहिवर शब्दबद्ध करू लागले. त्यातून हजारो वर्षांच्या मूक वेदनेला वाचा फुटली.

उषाकिरण आत्राम यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह आत्मसंवादात्मक असून आपल्या प्रश्नांबरोबरच आपल्या सखीच्या, मुलीच्या, आईच्या प्रश्नांचे स्वरूपही जाणून घेण्याचा कवयित्रीचा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. त्या पुढील ओळीतून संवाद साधतांना म्हणतात,

**"बाय ! तू रडू नगंस गं !**
**रडणं सुखी बायांचं काम आहे**
**आपल्याले रडाची जन्मापासूनच सव नाय**
**तू जन्मली तवा दगडानं नाळ कापली**
**सागाच्या पानाचं पांघरूण घालून**
**मोहाच्या ढोलीत - अंधारचिक पितं**
**तुला पेरसापेनची गाऊन गाणी निजवायची "१**

स्त्रियांचे दुःख अमाप असते. त्याच्या परिसीमा ठरलेल्या नसतात. त्यामुळे आपणच आपल्याला आपले दुःख सांगावे. याप्रमाणे कवयित्री आपल्या सारख्यांचे जगणे कवितेतून मांडते. अगदी अगदी सामंजस्याच्या भावनेतून स्त्रीजीवन वास्तवाचा त्या वेध घेतात.

कुसुम आलाम यांचा 'रान आसवांचे तळे' हा कवितासंग्रहात साध्या सोप्या सरळ भाषेत त्यांनी आपल्या भावना, आपली अनुभूती व्यक्त केल्यात. आदिवासी स्त्रीचे अनुभवविश्व त्यांच्या कवितांमधून साकार होताना दिसते. डॉ. विनायक तुमराम त्यांच्या कवितेबद्दल म्हणतात की, "सौ आलाम यांची ही कविता साधी स्पष्ट व थेट मारा करणारी आहे. शब्दबंबाळपणा आता तिने झटकून टाकला आहे. या कवितेतील आंतरिक ऊर्मींना ऊरबडवेपणाने पछाडलेले वाटत नाही. सोपे अर्थगर्भ पण बेडर शब्द हा तिचा शृंगार आहे. भाषिक दिखाऊपणा शोधूनही तिच्यात सापडत नाही"२ कुसुम आलाम यांच्या कवितेमधून आलेले सामाजिक प्रश्न व त्यांना हाताळण्यासाठीचे मानसिक बळ महत्वाचे आहे. आदिवासींचा जगण्यासाठीचा संघर्ष आणि त्यांच्यात जगण्याची ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता किती प्रचंड आहे हे कवयित्री शब्दबद्ध करते. 'स्वातंत्र्यास' या कवितेत त्या म्हणतात,

" रे स्वातंत्र्या !
आजकाल ह्या भुईने
वीर प्रसवणे सोडून दिले
फितूर घातकी, काळोखप्रेमी
पिक सर्वत्र फोफावलेले"३

प्रत्येक दिवसागणिक दुःखाची जातकुळी बदलते आहे. निर्लज्जपणाचा कळस होतो आहे. स्वातंत्र्यासाठी आमचे वीर लढले. आज मात्र स्थिती वेगळी आहे. काळोखाचे साम्राज्य चहूबाजूने पसरले आहे. परंतु शूरवीर तर जन्माला येताना दिसत नाहीत, असे वास्तव कवयित्री मांडताना दिसते. 'रान आसवांची तळे' या शीर्षकातच कवितेचा निश्चित प्रवास काय आहे हे लक्षात येते. आदिवासींच्या हतबलतेवर त्या दया दाखविण्यापेक्षा कठीण परिस्थितीत लढण्याची प्रेरणा देतात. आत्मसन्मानाने जगण्याचा सांगतात.

कुसुम कलाम यांचा 'रानपाखराची माय' हा कविता संग्रह रानशिवाराचे, निसर्गाचे आपल्यातील अस्तित्व अधोरेखित करणारा आहे. निसर्गाच्या सहवासात राहताना त्याच्या असण्याच्या अनेक खुणा आपल्यात सामावतात, त्याचेच प्रतिबिंब साहित्यातून अवतरल्यास वावगे ते काय? असे कवयित्रीला वाटते. याविषयी त्या म्हणतात,

"जन्म असतोच माणसाचा नक्षत्रांचे देणे
निसर्ग घालतो बाळलेणे
सूर्याचे उगवणे, पाखरांचे किलबिलणे
चंद्राचे हसणे, चांदण्यांचे दिसणे

कोकीळगाणे, मोराचे नाचणे
डोंगर कुशीतले वाहते झरे
पाण्याचे खळखळणे, लाटांचे लटपटणे
धरतीवरचे हिरवे गालिचे
पण तरीही मी निसर्गावर कविता लिहू नये?[४]

निसर्गाबरोबरच मानवी जीवनातील विविध चढउतार स्त्रियांच्या समस्या त्यांचे अस्तित्व यावर देखील कवयित्रीने केलेले भाष्य महत्त्वपूर्ण आहे.

कृष्णकुमार चांदेकर यांचा 'पतुसा' या कवितासंग्रहातून आदिवासींच्या एकूणच जगण्यावर प्रस्थापित व्यवस्थेने लादलेल्या अनेक गोष्टींना कवीने आपल्या कवितांमधून शब्दबद्ध केले आहे. समाज सुधारणेच्या नावाखाली अनेक जण आदिवासींची लूट करीत आहेत. त्यांना भुलवित आहेत, परंतु आदिवासी समाजाने आता जागृत होऊन जीवन जगावे हे सांगताना कवी म्हणतो,

"गर्व करणाऱ्या संस्कृतीत
आम्ही जगत आहोत
त्यांच्याच मर्जीने मरत आहोत
परंतु जोशी बाईची मांडी दिसली तर
ती अब्रू ठरते
आणि मडावी बाईची मांडी दिसली तर
ती संस्कृती ठरते, असे का?"[५]

आदिवासी संस्कृतीत स्त्रीला अतिशय मोलाचे स्थान आहे. परंतु स्त्रीला दासी, अबला म्हणून हिणविणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेच्या ढोंगीपणाचा कवी विद्रोही शैलीतून समाचार घेताना दिसतो. अब्रू आणि संस्कृतीच्या नावाखाली आदिवासी स्त्रीच्या पावित्र्याची खिल्ली उडवणाऱ्या या समाजव्यवस्थेची भूमिका कवीने शब्दबद्ध केली आहे.

आदिवासी समाजात स्त्रियांना सन्मानाने वागविले जाते. तिचा सन्मान केला जातो. मुलीचा जन्म हा आनंदाचा सोहळा असतो. आदिवासी स्त्री ही धैर्यवान, शीलवान आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारी जपणारी आहे. आपले कुटुंब, समाज, देश यासाठी बलिदान देणारी आहे. शौर्याने लढणाऱ्या अनेक स्त्रियांपैकी एक म्हणजे राणी दुर्गावती इ.स. १५६४ मध्ये पतिनिधनानंतर गोंड साम्राज्याचे रक्षण करणाऱ्या या वीरवतीबद्दल कवी विनायक तुमराम आपल्या 'गंडामंडल्याची महाराणी दुर्गावती' या कवितेत म्हणतात,

"दुर्गावती !
गोंडवनासाठी विजलेले तुझे आयुष्य
देऊन जाते इथल्या वन पुत्रांना क्रांतीची दीक्षा"[६]

स्त्रीजीवन आला शौर्याचे बळ देणाऱ्या महाराणी दुर्गावती बद्दल कवी वामन शेळमाके म्हणतात,

"आदिमा, इतिहास तुझा सत्य आहे
संघर्ष, क्रांती हाच तुझ्या मुक्तीचा मार्ग आहे
म्हणूनच क्रांतीवीर नारायणसिंह उईकेचे नाव
अजरामर आहे
स्त्री होती मर्दांनगी राणी दुर्गावती
गढमंडल्याची सम्राज्ञी"[७]

आदिवासी समाजात प्रेरणा देणारे अनेक वीर होऊन गेले आहेत. आदिवासींचा इतिहास समृद्ध आहे. केवळ तो जागविला गेला पाहिजे, असे कवी नमूद करतात. पती निधनानंतरही आपल्या समाजासाठी आणि साम्राज्यासाठी प्राणपणाने

बहामनी सत्तेशी लढणारी राणी दुर्गावती अनेक कवींच्या काव्याची प्रेरणा बनलेली आहे. 'गढामंडल्याची वीरांगना' या कवितेत कवयित्री कुसुम आला म्हणतात,

"गढामंडल्याची वीरांगणे दुर्गे
तू मर्दानी होऊन शत्रुशी लढलीस
तेव्हा सूर्य सुद्धा
सहस्त्र पटीने तेजाळला असेल
अवघी अवनी दुमदुमली असेल
तिच्या रोमारोमातून तुझ्यासाठी
स्फूर्तीचे गीत स्फुरले असतील"८

राणी दुर्गावती समस्त स्त्री जातीसाठी जगण्याची एक प्रेरणा आहे. परंतु दुर्गेच्या कुळातील आजच्या स्त्रीला मात्र औदासिन्य का आले आहे ? असा प्रश्न कवयित्री विचारते. गोंडवना साम्राज्याच्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी लढणाऱ्या या पराक्रमी महाराणीबद्दल 'विरांगणा राणी दुर्गावती' या कवितेत कवी सुनील कुमरे म्हणतात,

"म्हणूनच मी झिरपत ठेवणार पिढ्या न् पिढ्यातून
तुझी स्वातंत्र्याच्या अस्तित्वासाठी अभंग अमरगाथा
आणि सांगणार आहे तुझ्या भूमिपुत्रांना
तुझ्या शौर्याचा कटु अंत स्वराज्यासाठी
तुझा वीरश्री बाणा गोंडवण राष्ट्रासाठी
तू लढलीस आदिवासी इतिहास घडविण्यासाठी"९

सोळाव्या शतकाच्या मध्यात आपल्या राष्ट्रासाठी शूर अपने लढणारी आदिवासी स्त्री समाजातील स्त्रियांसाठी एक महान प्रेरणा आहे.

म. फुले यांच्या समाज उन्नतीच्या कार्याला बळ देण्याचे व स्वतः क्रांतीज्योत होऊन तेवत राहण्याचे महान कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले आहे. सनातन्यांचे दगड-माती शेणाचे वार झेलून समाजातील सर्व स्तरातील मुलींना शिकवून त्यांना ज्ञानाचे धडे गिरवायला लावणाऱ्या सावित्रीबाईंना अनेक कवी - कवयित्रींनी आपल्या कवितेतून शब्दबद्ध केले आहे. कवयित्री कुसुम आलाम सावित्रीबाईंच्या या शैक्षणिक सामाजिक कार्यास सलाम करताना म्हणतात,

"झाल्या असतील चिंधड्या तुझ्या काळजाच्या
आम्हास दुनियेच्या बरोबरीत आणतांना
रुतले असतील काटेही अगणित"१०

आदिवासी संस्कृती ही मातृसत्ताक आहे. मानवी जीवनातील तिचे बलिदान मान्य करणारी आहे. कुटुंबासाठी समाजासाठी स्त्री आपले सर्व आयुष्य वेचते परंतु त्याचे मोल हा समाज जाणवत नाही. तिच्या आहुतीची तिची दखल घेतली जात नाही. मराठी साहित्यात मातेवर कविता लिहून तिच्या घामाचे मोल अनेक कवींनी शब्दबद्ध केलेले आहे. आदिवासी कवितेत येणारी आई आदिम वेदना घेऊन अवतरते. तिच्या दुःखाची व्याप्ती निराळी आहे. तिच्या मनाचे विशालत्वही भिन्न आहे. अंगावर चिंध्या पांघरून जगणारी अपत्याच्या जीवास जपणारी आई रेखाटताना कवी वाहरू सोनवणे 'बाळ जीवाला जप' या कवितेत म्हणतात,

"घामाचा थेंब न् थेंब
रक्तानं फडफडत
निर्जीव, बेवारस होत असताना
चोळीला ठिगळे देत -
बाळ, जीवाला जप म्हणत

मला किती दिवस
निष्प्राण करत राहशील, आई"११

आपल्या आयुष्याची चिंता न करता मुलांच्या जगण्याला फुलविणारी आई कवीने शब्दबद्ध केली आहे. व्यवस्थेच्या चक्रात आपले मूल घर करणार तर नाही ना अशी भीती तिला वाटते आहे.

पतीची सावली बनून वावरणारी त्यास आधार देणारी. त्याच्या पोटाची भूक मिटविताना स्वतः उपाशी राहणारी आई साकारताना कवी म्हणतो,

"पोट भरून खा बरं
अश्रू ? अश्रूंचं काय
हे तर रोजच वाहत राहतात
तुम्ही जेवा पोट भरून"१२

स्वतः उपाशी राहून कुटुंबाच्या पोशिंद्याची काळजी करणाऱ्या आईच्या भावनेतून कवीने आदिवासी समाजातील स्त्रियांच्या भुकेचा गहन प्रश्न मांडला आहे. चतकोर भाकरीसाठी राबावे लागणे, नाही मिळाली तर उपाशी झोपावे लागणे. अशा अनेक समस्यांच्या चक्रव्यूहात आजचा आदिवासी समाज अडकलेला आहे हे वास्तव कवीने साकारले आहे.

आदिवासी कवितांमधून मनाला गहीवरुन टाकणारी आई जशी रेखाटलेली आहे. तसेच समाजातील स्त्रीसुद्धा रेखाटलेली आहे. तिच्या जगण्याचे विविध पैलू आणि कवींनी आपल्या निरीक्षणातून मांडले आहेत. कवी वाहरू सोनवणे 'जिवंत सावली' कवितेत म्हणतात,

"स्त्री : पुरुषाची सावली
जाते मागे मागे पावलावर पाऊल टाकत
माणुसकीचे स्वतंत्र अस्तित्व
नाकारलेलं व्यवस्थेन ;
तेव्हापासून डुबक्या खात
ती वाहत आली आहे
गुलामगिरीच्या पुरात इथपर्यंत"१३

आपल्या मनाच्या स्वातंत्र्याने जगणारी स्त्री या पुरुषप्रधान व्यवस्थेने आता आपल्या अधिकाराखाली घेतली आहे. तिच्यावर अनेक बंधने लादली आहेत. पुरुषांची सावली बनून ती जगते आहे. हे वास्तव कवी मांडतात.

समाजातील स्त्री जीवन वास्तवाचा मनाला हेलावणारा एक प्रसंग मांडताना कवी 'स्त्री'या कवितेत म्हणतात,

"एक वस्तू अशी
तिला वाटेत, घाटेत,
सापडेल तिथं रोखावं
मनाला आलं तर मिठीत घ्यावं
हौस फिटली तर सोडून द्यावं
हाक नाही बोंब नाही"१४

एक उपभोग्य वस्तू म्हणून स्त्रीचा कसा वापर केला जातो. तिच्या अब्रूचे कसे धिंडवडे काढले जातात. हे कवीने नेमक्या शब्दात रेखाटले आहे. 'रोजगार हमीच्या रांगेत' या कवितेत प्रस्थापित व्यवस्था हतबल स्त्रियांच्या शरीराला कशी ओरबाडते हे वास्तव मांडताना कवी म्हणतात,

"मातीची घमेली डोक्यावर
चढवून देतांना-
कॅमेरा फिरावा तशी

त्याची नजर फिरुन गेली
तिच्या चेहऱ्यावरून
आणि त्यानं स्मित केलं
शुद्धीवर आल्यावर... आणि
टक लावून पहात राहिला
घामेजलेलं शरीर नि
तिच्या जड पावलांकडे
रोजगार हमीच्या रांगेत
मिसळून जाईपर्यंत"१५

स्त्रियांच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेणारी ही यंत्रणा कशी उद्धट, उद्दाम आहे. तिच्या उपभोगाची, तिचे सर्वस्व हिरावून घेण्याची आस मनी बाळगणाऱ्या या मानवी व्यवस्थेचे वास्तव कवी मांडतो. अशा अनेक कवितांमधून कवीने समाजातील स्त्री जीवन वास्तव रेखाटले आहे.

आदिवासी स्त्री मनाला जागृत करणारी व खऱ्या लढाईस करणारी कविता उषाकिरण आत्राम यांची आहे "सांग राणे" या कवितेत त्या म्हणतात,

"दिवसभर कोऱ्या उन्हात ठिवल्यावर
ताडी गोरघ्याले आंबूट नशा चढते
टेंभुर्णीची काटकी सुकली तरी
पेटता पेटता फटाफट
तिडक्या उडवून ओळख देते
तू मात्र - दंडार ढेमस्यातच डुंबून जातेस
सांग राणे ? तू कुठल्या भारताच्या मातीआड राहतेस
सांग - तू कुठल्या भारताचं गीत गातेस ? राणे - आतातरी बोलकी हो?"१६

आदिवासी स्त्री ही शोषित म्हणून जीवन जगत आली आहे. परंतु त्या जगण्याची ओळख तिला पटवून देताना कवयित्रीने ताडी, टेंभुर्णीची काटकी यांची उदाहरणे दिली आहेत. ऊन्हात राबणारी, समाजव्यवस्थेच्या दडपणाखाली संसाराचा गाडा हाकणारी स्त्री ही दंडार, ढेमसा अशा नृत्यात कशी रममाण होऊ शकते? तिच्यातील क्रोधाग्नी कधीच कसा पेटून उठत नाही? आणि ती आहे त्या परिस्थितीत का स्वतःला बंदिस्त करून घेते आहे, असे अनेक प्रश्न कवयित्री विचारताना दिसते. रेलॉं म्हणजे एका आदिवासी गीताची लोकप्रिय धून. ही धून आदिवासींच्या समसमान, अविरत जगण्याची ओळख आहे. दुःखाचा विसर पाडणारी आणि बेधुंदपणातून ऊर्जा निर्माण करणारी ही धून अनेक कवितांमधून प्रतिमा बनून अवतरली आहे.

स्त्री ही सर्जनशीलतेचे प्रतिक आहे, नवनिर्माणाची क्षमता तिच्या ठायी वसलेली आहे. आदिवासी समाजात स्त्रियांची कुटुंब प्रमुख म्हणून असलेली जबाबदारी त्या चांगल्या पद्धतीने पार पाडतात. परंतु तरीही त्यांच्या वाट्याला येणारी दुःखे ही आदिम जाणिवेने भारलेली आहेत. परंपरागत स्त्री जीवन वेदनेशी त्या आपोआपच जोडल्या जातात, असे दिसून येते. आदिवासी कवितेत स्त्री जीवनावर भाष्य करणाऱ्या अनेक कविता आल्या आहेत. कवयित्री उषाकिरण आत्राम आपल्या 'समज' या कवितेत म्हणतात,

"आदिमांच्या या रक्ताची जात - वाघाची
सूर्याच्या वारसाची !
पेटणं जळणं आम्हास माहित हाय
रडणं आम्हास माहित नाय"१७

आदिवासी समाजातील स्त्री ही आदिमांच्या रक्ताची आहे, वाघाच्या जातीची आहे, त्यामुळे आपल्या अन्याय-अत्याचाराचा ती खुबीने सामना करू शकते, असा आशावाद कवयित्री निर्माण करते.

कवयित्री कुसुम अलाम 'जिच्या हाती पाळण्याची दोरी' या कवितेत म्हणतात,

**"दिवा घेऊन शोधायची गरज नाही**
**सूर्याचे तेज तुझ्या अंतरंगात आहे**
**घे शपथ या विशाल गगनाची**
**हे जग मी सुंदर करुन जाणार आहे"**[१८]

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' असे म्हणून स्त्रीचे महत्व जरी समाजाने मान्य केले असले तरी छळवणूक, तिच्यावरील बलात्कार, तिच्यावरील जीवघेणे हल्ले आजही थांबलेले नाहीत. आजही अनेक प्रश्नांच्या गुंत्यात तिचे जीवन अडकले आहे. त्यामुळे कवयित्रीने आपल्या कवितेतून आदिम जीवनाची स्त्रीला आठवण करुन देताना सूर्यसत्या इतका स्पष्ट इतिहास असताना स्त्रीने स्वतःला अबला न समजता सूर्य तेज सोबत घेऊन जगाला सुंदर बनवून सोडले पाहिजे, असा आत्मविश्वास शब्दबद्ध केला आहे.

**संदर्भ टिपा**


१) आत्राम उषाकिरण, म्होरकी, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९७, पृ.३५.
२) अलाम कुसुम, रान आसवांचे तळे, १९९८ अलाम कुसुम प्रकाशन, प्रस्तावना पृ.०९.
३) तत्रैव, २९.
४) आराम कुसुम, रानपाखरांची माय, हरिवंश प्रकाशन चंद्रपूर, प्रथमावृत्ती २०००, पृ.४७.
५) चांदेकर कृष्णकुमार, पतुसा, नभ प्रकाशन अमरावती, प्रथमावृत्ती १९९९, पृ.२१.
६) तुमराम विनायक, गोंडवन पेटले आहे, एकलव्य प्रकाशन चंद्रपूर, प्रथमावृत्ती १९८७, पृ.३६.
७) शेडमाके वामन, जागवा मने पेटवा मशाली, वंदन प्रकाशन अमरावती,.प्रथमावृत्ती १९९१, पृ.३८
८) आलाम कुसुम, रान आसवांचे तळे, उनि, पृ.३२
९) कुमरे सुनील तीरकमठा, हरिवंश प्रकाशन चंद्रपूर, प्रथमावृत्ती १९९९, पृ.६१
१०) आलाम कुसुम, आसवांची तळे, पृ.३६.
११) सोनवणे वाहरू, गोधड, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००६, पृ.०५
१२) तत्रैव, पृ.२६.
१३) तत्रैव, पृ.१३.
१४) तत्रैव, पृ.२३.
१५) तत्रैव, पृ.२९.
१६) आत्राम उषाकिरण, म्होरकी, पृ.४१,४२.
१७) आत्राम उषाकिरण, म्होरकी, पृ.३५.
१८) अलाम कुसुम, उनि., पृ.९०